# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २४/०६/२०२६

## मा. शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक समिती विशेष सभा
## सभा सूचना क्र. ०१

**प्रति,**
**सन्मा. श्री. / श्रीमती ---------------------------------------------------**
**सदस्य / सदस्या,**
**शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक समिती,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक समिती विशेष सभा शुक्रवार दि. ०३/०७/२०२६ रोजी सकाळी ११.४० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहाद्दुर शास्त्री सभागृहात शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक समिती सभा सुचना क्र. १, मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे.

तरी, विशेष शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक समितीचे सर्व सदस्यांनी उपस्थित रहावे,ही विनंती.

(दिनेश कैलास कानगुडे)
महापालिका सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. पिठासीन अधिकारी यांच्या मान्यतेने**

**सोबत :- १) निवडणूक कार्यक्रम**
**२) सभापती व उपसभापती पदासाठी नामनिर्देशन पत्र**

---

**मा. शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक समितीची विशेष सभा दि. ०३/०७/२०२६, सुचना क्रमांक ०१ विषयपत्रिका**

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| १ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण २ कलम ३०(३) अन्वये सन २०२६-२७ या कालावधीकरीता (दि. ३१ मार्च २०२७ पर्यंत) शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक समितीवर असणाऱ्या सदस्यांपैंकी एका सदस्याची "सभापती" या पदावर नेमणूक करणे. |
| २ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण २ कलम ३०(३) अन्वये सन २०२६-२७ या कालावधीकरीता (दि. ३१ मार्च २०२७ पर्यंत) शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक समितीवर असणाऱ्या सदस्यांपैंकी एका सदस्याची "उपसभापती" या पदावर नेमणूक करणे. |

(दिनेश कैलास कानगुडे)
महापालिका सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## शुक्रवार दि. ०३/०७/२०२६ रोजी होणाऱ्या मा. शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक समिती सभापती व उपसभापती पदाकरिता निवडणूक कार्यक्रम

| वार व दिनांक | तपशिल |
|---|---|
| मंगळवार<br>दि. ३० जुन, २०२६<br>(दुपारी ३.०० ते सायं. ५.००<br>वाजेपर्यंत) | सन २०२६-२७ कालावधीकरीता (दि. ३१ मार्च, २०२७ पर्यंत) शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक समिती सभापती व उपसभापती पदाचे नेमणूकीकरीता नामनिर्देशन पत्र विहित नमुन्यात महापालिका सचिवांकडे दाखल करणे. |
| शुक्रवार<br>दि. ०३ जुलै, २०२६<br>(सकाळी ११.४० वाजता<br>किंवा सभा सुरु झाल्यापासून) | प्रत्यक्ष सभेचे कामकाज सुरु झाल्यानंतर,<br>१) बोलविलेल्या विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी श्री. सौरभ कटियार, मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर हे असतील.<br>२) शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक समिती सभापती व उपसभापती पदासाठी प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी व उमेदवारी मागे घेणे.<br>३) कोणत्याही उमेदवारास पुर्ववर्ती पोटनियमान्वये यथोचितरित्या नामनिर्देशित सदस्यांचे नाव वाचून दाखविल्यानंतर १५ मिनिटांच्या आत त्याने सही केलेली लेखी नोटीस पिठासीन अधिकाऱ्यांकडे देऊन त्याची उमेदवारी मागे घेता येईल.<br>४) पिठासीन अधिकारी उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची नावे सदस्यांस वाचून दाखवतील.<br>५) शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक समिती सभापती व उपसभापती पदाचे निवडणूकीसाठी आवश्यकता भासल्यास मतांची नोंद हात वर करुन घेण्यात येईल.<br>६) निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला मतदानाद्वारे मिळालेल्या मतांची संख्या घोषित केल्यानंतर पिठासीन अधिकारी निकाल घोषित करण्याची कार्यवाही करतील. तद्नंतर उमेदवारांनी मिळविलेल्या मतांच्या संख्येनुसार चढत्याक्रमाने उमेदवाराची यादी तयार करतील. ज्या उमेदवाराला मतदानात जास्त मते पडतील तो उमेदवार रितसर निवडून आल्याची घोषणा करण्यांत येईल.<br>७) मते समसमान मिळाल्यास पिठासीन अधिकारी असे घोषित करतील की, निवडणूकीचा निकाल चिठ्ठया टाकून सोडतीद्वारे सोडविण्यात येईल. उपस्थित आणि मत देण्यास हक्कदार असलेले शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक समिती सदस्य बहूसंख्येने ठरवतील अशा व्यक्तींकडून चिठ्ठी काढण्यात येईल.<br>८) ज्या उमेदवाराच्या नावाने चिठ्ठी निघेल तो उमेदवार उक्त पदावर वैधरितीने निवडून आला असल्याचे घोषित करण्यांत येईल.<br>टिप :- सभापती पदाच्या निवडणूकीनंतर उपसभापती पदाकरीता वरील निवडणूक कार्यक्रमानुसार निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यात येईल. |

**(दिनेश कैलास कानगुडे)**
**महापालिका सचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**तिसरा मजला, मुख्य कार्यालय,**
**स्व. इंदिरा गांधी भवन,**
**छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)**
**दिनांक :- २४/०६/२०२६**